जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01-01-2020
Times of India

# Exams for sports quota students from Jan 4: SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Students of the Shivaji University, Kolhapur (SUK) who were busy in athletic activities during the early academic year will get a chance to appear for their semester exams from January 4.

The varsity had issued a circular regarding the same on December 27.

An official from the SUK's exam department said, "October and November witness a number of athletic competitions. The players who participate in these competition are often busy with preparations due to which they miss their semester examinations. Hence, the initiative will give such students a chance to appear for exams they missed. These exams have a different schedule than that of the regular students."

The official further said that the respective exam centres from the division have been asked to conduct the exams of such students as per the examination department norms. The department has attached the schedule (in the circular) and examination centre for these students where they can appear for the exams. Students can use the hall tickets that they were given for October/ November semester exams.

The exam centres for these students have been already finalised according to their courses. The centres have been decided with respect to the number of students appearing for the said exams.

"For Kolhapur district, city-based New College will host the said exam. For Sangli, Shrimati Kasturbai Walchand College will host the exam, followed by Lal Bahadur Shastri College in Satara," the circular read.

The varsity's winter semester examination commenced in October earlier this year and is in the final stage. In fact, the results of most exams are already out. SUK officials said that the admission process of most courses got delayed due to floods in August.

File photo



The varsity had issued a circular regarding the same on December 27

01-01-2020

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनातून 'नॅक' 'ए' प्लस मानांकनाकडे वाटचाल

## शिवाजी विद्यापीठ संशोधनात जागतिक पातळीवर अव्वल : शासकीय प्रकल्पावरील कन्स्लटन्सीद्वारे अर्थशास्त्र विभागाकडून ३० लाखांचा निधी

अहिल्या परकाळे

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने जागतिक दर्जाच्या संशोधन क्षेत्रात उत्तुंग कार्य करून, विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. युएस न्यूज एज्युकेशन रँकिंगअंतर्गत बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या गुणवत्ता यादीत मटेरियल सायन्स विभागामध्ये (पदार्थविज्ञानशास्त्र) शिवाजी विद्यापीठाने देशात दहावा क्रमांक पटकावला आहे. यावरूनच विद्यापीठाने संशोधनात गगनभरारी घेतल्याचे सिद्ध केले



आहे. तसेच विज्ञान विभागात मटेरियल सायन्स, प्राणीशास्त्र विभागात रेशीम उद्योग, राज्यासह देशात नंबर वन असलेल्या लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये दीड हजार दुर्मीळ व औषधी वनस्पतींचे संवर्धन केले आहे. त्यामुळे संशोधन, शिक्षण, क्रीडा, प्रशासकीय आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाची नॅक 'ए प्लस' मानांकनाकडे वाटचाल सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठातील नॅक 'ए प्लस' मानांकनाची तयारी युद्ध पातळीवर सुरू आहे. अर्थशास्त्र विभागाने शासनाच्या विविध प्रकल्पांवरील कन्स्लटन्सीद्वारे जवळपास ३० लाखांचा निधी विद्यापीठाला मिळवून दिला आहे. तसेच हर्बल मेडीसिन, नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स, वनस्पतीशास्त्रातील ऊती संवर्धन, आदी विषयातील संशोधन जागतिक दर्जाचे बनले आहे. तसेच विद्यापीठाने पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनून देशातील इतर विद्यापीठासमोर आदर्श निर्माण केला आहे.

यासह क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठाने बहुमुल्य योगदान दिले आहे. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. तसेच दीड कोटी रूपयांचे अत्याधुनिक साहित्य खरेदी करून खेळाडूंना प्रोत्सहन दिले आहे. यासह सामाजिक कार्यात यंदा ऑगस्ट महिन्यात अचानक आलेल्या आस्मानी संकट म्हणजे महापुराच्या कालावधीमध्ये जवळपास महिनाभर करवीरवासियांना राहण्यासाठी आसरा, स्वच्छ पाणी आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून दिला. ही विद्यापीठसाठी कौतुकाची गोष्ट आहे.

### संशोधन विद्यापीठाचा आत्मा



विद्यापीठातील बायोकेमिकल, केमिकल आणि नॅनो टेक्नॉलॉजीमधील संशोधन उच्च दर्जाचे आहे. याचा दर्जा स्कोपस सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेने आधोरेखित केला आहे. त्यामुळे संशोधन म्हणजे शिवाजी विद्यापीठाचा आत्मा बनला आहे. या संशोधनाच्या जोरावर 'नॅक"चे उत्तमातील उत्तम मानांकन मिळेल, असा आत्मविश्वास आहे.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे (शिवाजी विद्यापीठ)**

### संशोधनातील ठळक गोष्टी

- युजीसीकडून समाजोपयोगी संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाला स्ट्राईड अंतर्गत एक कोटी रुपयांचे अनुदान
- विद्यापीठ परिक्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेतंर्गत ११ लाखांचा निधी
- मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिलेल्या ७ कोटी अनुदानातून विद्यापीठात सायबर सिक्युरिटी केंद्राची स्थापना.
- महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना स्वनिधीतून प्रोत्साहनपर संशोधन अनुदान
- इन्क्युबेशन सेंटर अंतर्गत संशोधनासाठी अनुदान

विद्यार्थी, शिक्षक, पालक, नागरिक



यांच्या शारीरिक तंदुरुस्ती-साठी 'लोकमत'चा महामॅरेथॉन हा उपक्रम उपयुक्त ठरणारा आहे. त्यामध्ये सर्वांनी सहभागी होऊन आपले आणि कुटुंबियांचे आरोग्य सदृढ ठेवावे. या महामॅरेथॉनमध्ये एक वेगळी ऊर्जा मिळते आणि आपला उत्साह टिकून राहतो. गेल्या दोन वर्षांपासून या महामॅरेथॉनमध्ये मीदेखील सहभागी होतो.

- डॉ. विलास नांदवडेकर,
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

# शिवाजी विद्यापीठाच्या समृद्ध पर्यावरणाचा पक्ष्यांना लळा

## सुरक्षिततेमुळे अधिवास वाढला : विविध परिसरात पक्षी कॉलनी

प्रदीप शिंदे।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पक्षी हे पर्यावरणाचे मापदंड असतात. विविध जातींच्या वेगवेगळ्या अधिवास असलेल्या भरपूर पक्ष्यांची संख्या ही समृद्ध पर्यावरणाचे पुरावे आहेत. शिवाजी विद्यापीठ परिसरात असलेले मुबलक पाणी, जैवविविधतेने समृद्ध यामुळे पक्ष्यांना हा परिसर सुरक्षित वाटू लागल्याने या परिसरात त्यांचा अधिवास वाढवत असून, त्यांची एकप्रकारे कॉलनीच तयार होत आहेत.

आधुनिकीकरणाच्या युगात निसर्ग साधनसंपत्तीवर मोठ्या प्रमाणावर संकट येत आहेत. त्यात शहरीकरण, वाढत जाणारी लोकसंख्या, जंगलाची होत असलेली तोड, नष्ट होत चाललेले वन्यजिवांचे अधिवास, जैविक संपत्तीला अमर्यादा



येत असताना शिवाजी विद्यापीठ परिसरात पक्षी, फुलपाखरे, सरपटणाऱ्या प्राण्यांची संख्या वाढत आहे. या सर्वांचा शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र

**गुड न्यूज**
**नववर्ष २०२०**

अधिविभागाच्या वतीने निरीक्षण करण्यात आले. त्यामध्ये त्यांनी परिसरातील पक्षी, फुलपाखरे, साप यांच्यासह विविध जैवविविधेतच्या नोंदी केल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखालील प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व कर्मचारी यांनी नियोजनबद्ध विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली आहे. तसेच सर्व परिसरात नैसर्गिक पाण्याचा स्रोत नियोजनबद्ध केल्याने मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा परिसर हिरवागार बनला आहे.



| 96 | 136 | 59 | 15 | 15 | 04 | 02 |
|---|---|---|---|---|---|---|
| विविध प्रकारची झाडे | विविध प्रजातींचे पक्षी | प्रकारची फुलपाखरे | प्रकारचे साप | प्रकारचे बेडूक (उभयचर प्राणी) | प्रकारचे सरडे | प्रकारचे कासव |



**१३ हजार ४७३ झाडे :** शिवाजी विद्यापीठ परिसरात १३ हजार ४७३ विविध प्रकारची झाडे आहेत. यामध्ये १३६ प्रकारची विविध प्रजातींचे पक्षी आढळून आले आहेत. १५ प्रकारचे साप आहेत. त्यामध्ये ११ बिनविषारी, तर चार विषारी साप आहेत. चार प्रकारचे सरडे आहेत. दोन प्रकारचे कासव आहे. ५९ प्रकारची फुलपाखरे आहेत. यांसह ससे, रानमांजर, भटकी कुत्रीपण आहेत.

### अशी घेतली नोंद

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली या नोंदी करण्यात आल्या. विद्यापीठाच्या ८५५ एकर परिसराची ४६ भागांमध्ये विभागणी करण्यात आली. प्रत्येक भागासाठी दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांच्यामार्फत त्या भागातील त्या परिसरातील झाडे, पाणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, जलचर प्राणी यांची नोंद घेतली.



**तीन तलाव :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात राजाराम तलाव, भाषा भवन आणि संगीत विभागाच्या पाठीमागील बाजूस तीन प्रकारची मोठी तळी आहेत. या ठिकाणी स्थलांतरित पक्षी पण येत आहेत.

**कॉलनी :** परिसरातील ठरावीक भागांमध्ये वटवाघूळ, घुबड यांचा अधिवास आहे. त्यांच्यासह विदेशी पक्ष्यांची घरटी वाढत आहेत. त्यामधून त्यांची कॉलनीच तयार होत आहे.





"शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात असलेल्या वृक्षांचे जतन करुन नव्याने लावण्यात आलेल्या वृक्षलागवडीमुळे हा परिसर हिरवागार झाला आहे. येथील नैसर्गिक पाण्याच्या स्रोताचे जतन केल्याने पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे. अशा सर्व घटकांमुळे विद्यापीठ परिसर जैवविविधतेने समृद्ध झाला आहे. त्यामुळे पक्ष्यांसह अन्य प्राण्यांची संख्या वाढत आहेत.

- डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख